
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 3 | NOVEMBER - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# हैद्राबाद संस्थानात आर्य समाजाचे कार्य

प्रा. विकास विलासराव शिंदे
इतिहास विभाग प्रमुख , माऊली महाविद्यालय, वडाळा , ता.उ. सोलापूर जि. सोलापूर.




**प्रस्तावना :**

ब्रिटिशांच्या भारतातील सत्तेच्या स्थापनेनंतर त्यांनी भारताची दोन प्रदेशात विभागणी केली होती. पहिला विभाग ब्रिटिश इंडिया म्हणजे खालसा भारत व दुसरा विभाग प्रिन्स्ली इंडिया म्हणजे संस्थानी भारत. ब्रिटिश खालसा प्रदेश व संस्थानी भारत यांच्या प्रशासकीय स्वरुपामध्ये खूप मोठया प्रमाणावर फरक होता याला कारण म्हणजे बिटिशांनी खालसा केलेल्या भागाचे प्रशासन गव्हर्नर जनरलच्या माध्यमातून चालविले जात होते, तर संस्थानी भारताचा कारभार हा संस्थानिकांच्या हातामध्येच होता व तेथील प्रशासन संस्थानिकाकडून चालविले जात होते. पण या संस्थानिकांच्यावर सार्वभौमत्व हे ब्रिटिशांचेच असे. त्यामुळे संस्थांनी जनतेला दुहेरी गुलामगिरीत रहावे लागत होते. या संस्थानांमध्ये विसाव्या शतकाच्या दुसऱ्या शतकाच्या शेवटी जागृतीस सुरुवात झाली. अशा संस्थानापैकी हैद्राबाद संस्थान एक आहे.

**हैद्राबाद संस्थान :-**

ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतात जवळपास ५६३ देशी राज्ये आणि संस्थाने होती. दक्षिण भारतात श्रावणकोर, बडोदा, कोल्हापूर, नागपूर आणि हैद्राबाद ही पाच ठिकाण होते. यापैकी मोगल साम्राज्याच्या विघटनाच्या काळात जन्माला आलेले हैद्राबादचे संस्थान भारताच्या मध्यभागी वसले होते. भारतातील तीन चार मोठया संस्थानापैकी हैद्राबादचे शासक हे सर्वसाधरणत: ब्रिटिशधार्जिणे असल्यामुळे हैद्राबादच्या अंतर्गत कारभारात ब्रिटिशांचा हस्तक्षेप होत नसे हैद्राबादच्या प्रजेपैकी सुमारे ८५ टक्के लोक हिंदू व जेमतेम १५ टक्के मुसलमान असूनही शासक मुसलमान असल्यामुळे हिंदू प्रजेवर सतत अन्याय होई. १९११ साली मीर उस्मान अली खान निजाम बनल्यापासून शासनात सुधारणा घडवून आणण्याचा सल्ला ब्रिटिश सरकारने त्याला अधूनमधून दिला असला तरी त्याचा निजामावर फारसा परिणाम झाला नाही. हिंदू प्रजेवरील जुलुमान व अत्याचारात कधी खंड पडला नाही. हैद्राबादमधील हिंदू प्रजा सतत दडपली जाण्या ाचे एक महत्वाचे कारण होते ते म्हणजे त्यांच्यातील ऐक्याचा अभाव हिंदू प्रजा कानडी, तेलगू व मराठी अशा तीन गटात विभागलेली असल्यामुळे निजामाच्या शोशक व जुलमी शासनाला संघटितरीत्या विरोध करणे त्यांना शक्य होत नव्हते. हैद्राबाद राज्यात मराठवाडा, तेलगंणा, कर्नाटक या प्रादेशिक विभागांचा समावेश होत होता. १९२० नंतर हैद्राबाद मधील हिंदू प्रजेच्या प्रबोधनाची कार्य आर्य समाजी मंडळींनी हाती घेतले.

**आर्य समाज :-**

स्वामी दयानंद सरस्वती यांनी १० एप्रिल १८७५ रोजी सर्वप्रथम मुंबई येथे आर्य समाज या संघटनेची स्थापना केली तर इ.स. १८८० मध्ये हैद्राबाद संस्थानात मराठवाडयातील बीड जिल्हा, ता. किल्ले धारुर या ठिकाणी सर्वप्रथम आर्य समाजाची स्थापना झाली.पुढे इ.स. १८९२ मध्ये या आर्य समाजाच्या शाखेचे स्थलांतर हैद्राबाद येथे सुलतानबाजार या ठिकाणी करण्यात आले. खऱ्या अर्थाने येथूनच आर्य समाजाच्या कार्याची सुरुवात झाली. बॅरिस्टर विनायकराव कोरटकर हे आर्य समाजाचे अध्यक्ष होते. तर उदगीरचे बन्सीलालजी हे मुख्यमंत्री होते. इ.स. १९३० मध्ये संस्थानातील प्रत्येक जिल्हयात आर्य समाजाच्या शाखा स्थापना करण्यात आल्या. हैद्राबाद संस्थानाच्या स्वातंत्र्य आंदोलनाची उभारणी करण्याचे महत्वाचे कार्य आर्य समाजानेच केले. संस्थानातील जनतेत जनजागृती करुन आंदोलनाची पायाभरणी आर्य समाजाने केली नसती तर संस्थानातील संपूर्ण समाज हैद्राबाद स्वातंत्र्य आंदोलनात पेटून उठला नसता. सामाजिक धार्मिक सुधारणा घडवून आणणे हे आर्य समाजाचे मूळ कार्य होते.

**आर्य समाज-समाज जागृतीचे कार्य :-**

संस्थानातील हिंदू समाजात धार्मिक आणि राजकीय जागृती करण्याचे महान कार्य आर्य समाजानेच केले. समाजात राजकीय जागृती झाल्याशिवाय तो अन्याय व अत्याचाराविरुध्द उद्रेकाने पेटून उठत नसतो. आर्य समाजाने केलेल्या जनजागृतीमुळेच हिंदू समाज निजाम सरकारविरुध्द उद्रेकाने पेटून उठला. उदगीरचे भाई बन्सीलालजी यांनी उदगीरला आपले मुख्य कार्यालय उघडले. त्यांनी वैदिक संदेश या नावाचे वृत्तपत्र सोलापूर येथून प्रसिध्द करण्यास सुरुवात केली. सोलापूर येथून सुदर्शन हे आर्य समाजाचे मुखपत्र प्रसिध्द होत होते. हैद्राबाद येथून वैदिक आदर्श हे साप्ताहिक पंडित नरेंद्र प्रसिध्द करीत होते. या वृत्तपत्रांदवारे त्यांनी समाजात जागृती घडूवन आणली व लोकांना संघटीत केले. धारुर येथील धारुर आर्य समाज या केंद्रानेही महत्वाची समाज जागृती केली. स्वामी दयानंदांच्या सिध्दांताचे ते प्रचार केंद्र होते. बन्सीलाल तिवारी व पंडित आर्य भानुजी यांनी धारुर आर्य समाजाच्या उन्नती मध्ये सिंहाची भूमिका बजाविली.

इ.स. १८९७ साली महात्मा बेनी माधव, पंडित योगानंद, स्वामी आत्मानंद सरस्वती, पंडित केशवराव वकिल, राजा गोविंद प्रसाद, श्री इंद्रजित, भवानी शंकर, श्यामलाल व बन्सीलाल यांनी आर्य समाजाचा केलेला प्रचार महत्वाचा ठरला. त्या जातीयेतेला मुठ माती देऊन आपण सर्व समान व एक आहोत ही भावना समाजात रुजविली. त्यामुळे समाज संघटीत होऊ शकला. स्वामी श्रध्दानंदांनी इ.स. १९०१ साली हरिदवार जवळ गुरुकुल कांगडीची स्थापना केली. आणि हे आर्य समाजाचे प्रमुख राष्ट्रीय शिक्षणाचे केंद्र बनले. आज ही संस्था केंद्रीय विद्यापीठ म्हणून सर्वत्र ज्ञात आहे. या स्वामी श्रध्दानंदांनी समाज जागृतीचे डिसेंबर १९३४ रोजी त्यांनी हैद्राबादला वैदिक आदर्श हे साप्ताहिक सुरु केले. त्यांची जनजागृतीच्या कार्यात मोठा वाटा होता. आर्य समाजाने ठिकठिकाणी आर्य कन्या पाठशाळा स्थापन केल्या व त्यांदवारे स्त्रियांमध्ये जागृती घडवून आणली. त्यामुळे स्त्रिया संघटीत होऊ शकल्या. थोडक्यात समाज निजामाच्या विरोधात पेटून उठला.

**सामाजिक सुधारणा :-**

आर्य समाजाने केलेल्या सामाजिक सुधारणामुळे संस्थानात एक राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागली. हिंदू धर्माला प्राप्त झालेले विकृत स्वरुप नाहीसे करणे, वैदिक धर्माचे पुर्नजीवन करणे. वेदाध्ययनाचा अधिकार समाजातील सर्व जातीना देणे. वेदातील ज्ञान सर्वांना समजावे यासाठी ते हिंदी भाषेत करुन उपलब्ध करणे, यज्ञोपविधी संस्कार करण्याचा अधिकार सर्व जातीना देणे, विभक्त समाजाला संघटित करणे, जातीय विशमता नष्ट करुन सामाजिक समता प्रस्थापित करण व अस्पृश्यता नष्ट करणे. इत्यादी कार्यक्रम आर्य समाजाने राबविले. धर्मांतरित हिंदूना पुन्हा हिंदू धर्माची दिशा देण्याचेही काम आर्य समाजाने केले. आर्य समाजाची दारे सर्व जातीसाठी खुली होती. त्यांनी दलितांच्या उध्दाराचे महान कार्य केले. आर्य समाजाच्या या कार्यामुळे सामाजिक ऐक्य आणि धार्मिक सलोखा निर्माण झाला. परिणामी आर्य समाजाने सुरु केलेल्या चळवळीत दलितांशिवाय समाजातील सर्व जातीतील लोकांनी सहभाग घेतला आंतर जातीय विवाहा सर्वप्रथम आर्य समाजानेच प्रोत्साहन दिले. विधवांच्या पुर्नविवाहास चालना दिली. गणपतराव वैद्य या ब्राम्हण आर्य समाजी व्यक्तिने शांतीदेवी या नावाच्या अस्पृश्य स्त्री बरोबर आंरजातीय विवाह केला. पंडित मनोहर लालजी व पंडित शंकरदेव विद्यालंकार हे जन्मतः हरीजन होते. परंतु त्यांनी ब्राम्हण मुलीबरोबर विवाह केला होता. या विरोधाला न जुमानता आर्य समाजाने आपले कार्य केले आणि त्या कार्यादवारे संस्थानातील हिंदू समाजात ऐक्य निर्माण केले व त्यांना संघटित करुन निजामाच्या विरोधात खंबीरपणे उभे केले. निजाम सरकारला सर्वप्रथम उघडपणे विरोध करण्याचे कार्य आणि धाडस आर्य समाज या संघटनेनेच केले. आर्य समाजाने ठिकठिकाणी आर्य समाज मंदिरे, व्यायाम शाळा व वाचनालये काढली होती. आर्य समाजाच्या कार्यामुळे लोक निजामाच्या विरोधात दंड थोपटून उठले. त्यामुळे सरकारने आर्य समाजाची चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला.

**आर्य समाजाच्या कार्याचे मूल्यमापन :-**

हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामात आर्य समाजाने केलेल्या कार्याचे मूल्यमापन पुढील प्रमाणे करता येईल.

१) हैद्राबाद संस्थानात आर्य समाजाने व्यापक स्वरुपाचे कार्य केले. आर्य समाजोच सर्व प्रथम सत्याग्रह लढयाचे रणशिंग फुंकले आणि स्वातंत्र्यासाठी प्रभावीपणे संघर्ष केला.
२) हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथा, रुढी व परंपरांचे उच्चाटन करुन शुध्द वैदिक धर्माचे तत्वज्ञान व स्वरुप समाजापुढे मांडले.
३) जाती व्यवस्था आणि अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी प्रयत्न केला. व दलित उध्दारांचे कार्य हाती घेतले.
४) आंतरजातीय विवाहास आणि पुर्नविवाहास प्रोत्साहन दिले. विधवा विवाहावरची बंदी अन्यायकारक असल्याने त्याबाबत केशवराव कोटकरांनी बाबेहुकूमत मध्ये एक विधेयक मांडले होते.
५) सामाजिक व धार्मिक कार्याच्या माध्यमातून आर्य समाजाने संस्थानातील जनतेस राष्ट्रीयत्वाची जागृती केली.
६) आर्य समाजाने हैद्राबाद स्वातंत्र्य आंदोलनाची पायाभरणी केली म्हणून स्टेट कॉग्रेस निजामाविरुध्द खंबीरपणे लढा देऊ शकले.
७) आर्य समाजानेआपली दारे सर्व जातीतील लोकांना खुली केले जबरदस्तीने मुस्लिम बनविलेल्या हिंदूचे वैदिक पध्दतीत शुध्दीकरण करुन त्यांना आर्य समाजाची दीक्षा दिली. अस्पृश्यांना आर्य समाजात घेतले. या महान कार्यामुळे सामाजिक ऐक्य व धार्मिक एकता निर्माण झाले.
८) संस्थानातील समाजात जनजागृती करुन त्यांना वैदिक धर्माच्या ध्वजाखाली स्वातंत्र्य आंदोलनासाठी सशस्त्र संघटीत केले.

९) आर्य समाजाने जातीप्रथा, अस्पृश्यता, विधवा विवाहास बंदी व अनिष्ठ रुढी परंपरा विरुध्द बंड पुकारले, परंतु या कार्यामुळे निजाम सरकार व हिंदू धर्मातील कर्मठ लोकांनीही कडाडून विरोध केला.
१०) आर्य समाजाची चळवळ दडपण्यासाठी सरकारने दडपशाही सुरु केली. हिंदूवर अन्याय, अत्याचार केले. या कृतीचा आर्य समाजाने सशस्त्र प्रतिकार केला. त्यामुळे अनेक आर्य लोकांना प्राणास मुकावे लगाले.
११) हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्रामात आर्य समाज आघाडीवर राहिला. स्वातंत्र्य संग्रामातील आर्य समाजाची कामगिरी सवुवर्णाक्षरांनी लिहावी अशी आहे. उदगीरचे श्यामलालजी व बन्सीलालजी, गुंजोटीचे वेदप्रकाशजी आर्य, हुमनाबादचे शिवचंद्र, तांडूरडे विष्णू भागवत, उमरीचे दत्तात्रय उत्तरवार व निजामाबादचे राधाकृष्ण या अर्य समाजी नेत्यांनी स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले.

**उपसंहार :-**

१८ जुलै १९४७ रोजी ब्रिटिश सरकारने भारतीय स्वातंत्र्याचा कायदा पास केला. या कादयानुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत ब्रिटिशांच्या राजकीय वर्चस्वातून मुक्त झाला. परंतु देशी राज्ये व संस्थाने भारतीय संघराज्यात कशी विलीन करुन घ्यावयाची हा मोठा प्रश्न भारत सरकारपूढे निर्माण झाला. शेवटी भारताचे पंतप्रधान पंडित नेहरु आणि गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी बहुतेक संस्थाने भारतात विलीन करुन घेतली. परंतु हैद्राबाद राज्याचा सत्ताधीश निजाम-मीर-उस्मान अलीखान याने ११ जून १९४७ रोजी आपले राज्य स्वतंत्र्य राहणार असल्याचे जाहीर केले. तसेच निजामाची सत्ता अन्यायी, अत्याचारी होती. याशिवाय देशाच्या व दखनच्या मध्यभागी असलेले हैद्राबाद संस्थानाचे भारतात विलीनीरिण झाल्याशिवाय स्वातंत्र्याला पूर्णत्व प्राप्त होणार नव्हते. यासाठी आर्य समाजाने केलेल्या सामाजिक सुधारणा अनेक नेत्यांची कामगिरी विशेष महत्वाची आहे. शिवाय जनजागृती झाल्यामुळे जनतेने हैद्राबाद राज्याचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण करण्यासाठी सत्याग्रह व सशस्त्र आंदोलन केले. शेवटी १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारत सरकारने हैद्राबाद राज्याच्या विलीनीकरणासाठी जनतेने जे सत्याग्रह व सशस्त्र आंदोलने केले. हेच आंदोलन भारतीय इतिहासात हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्राम या नावाने ओळखले जाते.

**संदर्भ :-**


१) डॉ. शांता कोठेकर - आधुनिक भारताचा इतिहास (१९४७-२०००) श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर-नोव्हें २०१०
२) डॉ. अनिल कठारे - आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१८१८-१९६०) विद्या बुक्स पब्लिशर्स- औरंगपुरा, औरंगाबाद-जून २०१२
३) भालेराव अनंत - हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा मुंबई, मौजे प्रकाशनग्रह, २००१
४) फडके य.दी. - विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड ०३ श्री विद्या प्रकाशन, पुणे १९९३
५) संशोधक - इतिहासाचार्य वि.का राजवाडे संशोधन मंडळ, धुळे. २०१४
६) महाराष्ट्र इतिहास - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे-२०१२